मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
निवडणुक विभाग
EMAIL ID :electionmbmc@gmail.com/election@mbmc.gov.in दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/नि.वि/ ०४ /२०२३-२४

दि. २०/१०/२०२३

// निवडणुक तात्काळ //

## // परिपत्रक //

दिनांक 1 नोव्हेंबर 2023 अर्हता दिनांकावर आधारित कोंकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या अद्यावत करणे बाबतचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. मात्र पदवीधर धारकांमध्ये मतदार नोंदणी करणे बाबत अनास्था दिसुन येत असल्याने सदर कार्यक्रमास अल्प प्रतिसाद मिळत आहे. पदवीधर मतदारांची नोंदणी मोठया प्रमाणात होणे करीता कार्यालयातील सर्व पदवीधर अधिकारी / कर्मचारी यांचे नमुना 18 भरुन घेणे बाबत दि.18/10/2023 रोजीच्या बैठकीत मा. उजिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले आहेत. तसेच पदनिर्देशित अधिकारी 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ कार्यालया कडुन निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व विभाग प्रमुख / प्रभाग अधिकारी / सहा. आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व पदवीधर अधिकारी / कर्मचारी यांचे पदवीधर मतदार नोंदणीचे नमुना 18 भरुन तळमजला, तहसिलदार कार्यालय, परमपुज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार भवन, अमृतवाणी रोड, मॅक्सस मॉल च्या मागे भाईंदर (पश्चिम) येथे जमा करणे बाबत निर्देश दयाव्येत. **सदर पदवीधर मतदार नोंदणी ऑनलाईन पध्दतीने ceo.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर करता येईल.

सदर काम राष्ट्रीय काम असल्याने सर्व पदवीधर अधिकारी / कर्मचारी यांची नोंदणी होईल याकडे सर्व विभाग प्रमुख / प्रभाग अधिकारी / सहा. आयुक्त यांनी प्रथम प्राधान्याने लक्ष दयावे.

सदर कामात काही अडचण आल्यास समन्वय अधिकारी श्री. सुनील यादव सहा. आयुक्त निवडणुक विभाग यांचेशी संपर्क साधावा. तसेच जमा केलेल्या नमुना 18 चा अहवाल निवडणुक विभागास सादर करावा.

**(मारुती गायकवाड)**
**उप-आयुक्त (मु.) तथा उप-निवडणुक अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत उचित कार्यवाही करीता :-

1. सर्व विभाग प्रमुख
2. सर्व प्रभाग अधिकारी
3. शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग
   - **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पदविधर शिक्षकांचे नमुना क्रं.18 भरुन घ्यावेत.**
4. वैदयकीय आरोग्य अधिकारी (वैद्यकिय विभाग)
   - **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकिय व्यवसायाशी निगडीत सर्व पदवीधर धारकांचे नमुना क्रं.18 भरुन घ्यावेत.**

## १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ

पत्ता :- प.पु.केशव भवन इमारत, तळमजला, मॅक्सेस मॉलच्या मागे,
अमृतवाणी मार्ग,अप्पर तहसिलदार कार्यालयाच्याखाली, भाईंदर(प.), ता.जि.ठाणे.४०११०१
दूरध्वनी क्रमांक-०२२-२८४५६१०४ ईमेल – 145mirabhayandar1@gmail.com

क्र./निवडणूक/मि.भा./सुसूत्रिकरण/कावि१६५ /२०२३ दिनांक -१८/१०/२०२३

निवडणूक विभाग
आ.क्र. ९२०
दिनांक: १९/१०/२०२३

**प्रति,**
**मा. आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विषय :– दिनांक ०१ नोव्हेंबर ,२०२३ अर्हता दिनांकावर आधारीत कोकण विभाग पदवीधर मतदार संघांच्या याद्या तयार करणेबाबतचा कार्यक्रम.

**संदर्भ** :- मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष -1/ मेज-4/पदवीधर / दि. ०८/१०/२०२३.

**महोदय,**

मा भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०१ नोव्हेंबर ,२०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत कोकण विभागातील पदवीधर मतदार याद्यांचा पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. त्याकरीता पदवीधर मतदार याद्या नव्याने तयार करावयाच्या आहेत.

पदवीधर मतदार नोंदणी साठी नमूना फॉर्म नं. १८ दिनांक ३० सप्टेंबर २०२३ पासून स्विकारण्याचे काम चालू झालेले असून आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयातील सर्व पात्र पदवीधर कर्मचारी यांची पदवीधर मतदार नोदणी हाणे आवश्यक आहि. तरी अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ पूर्वी नोंदणी करुन घेणेबाबत संबधित सर्व अधिकारी / कर्मचारी यास सुचना करुन १००% पात्र पदवीधर अधिकारी / कर्मचारी यांची पदवीधर मतदार नोंदणी करून घ्यावी.

सदर पदवीधर मतदार नोंदणी ऑनलाईन पध्दतीने ceo.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर करता येईल . त्याच प्रमाणे नमूना फॉर्म नं. १८ ऑफलाईन पध्दतीने अधिकारी / कर्मचारी यांचे रहिवासी पत्ता ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणांच्या जवळील तहसिल कार्यालय / मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय या ठिकाणी योग्य आवश्यक पुरावे जोडून परिपूर्ण भरून नोंदणी करता येईल.

सदर पदवीधर मतदार नोंदणी करताना नमुना फॉर्म नं.१८ पूर्ण भरुन पुढील पैकी आवश्यक कागदपत्रे जोडून जवळील तहसिल कार्यालय/ मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय येथे जमा करावे.

१) मार्कशिट किंवा convocation प्रमाणपत्र

2) आधार कार्ड

3) इलेक्शन कार्ड

4) रेशन कार्ड किंवा लाईट बिल

5) नावात बदल असल्यास लग्न प्रमाणपत्र किंवा गॅझेट कॉपी किंवा PAN कार्ड

६) (नोंदणी करणारा मतदार हा ३१ ऑक्टोबर २०२० पर्यत पदवीधर झालेला असावा त्यानंतर पदवीधर झाला असेल त्यांनी फॉर्म भरु नये.)

७) एक पासपोर्ट साइज कलर फोटो

८) सर्व झेरॉक्स वर आपली सही करावी.

तरी आपल्या अधिनस्त कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना पदवीधर मतदार नोंदणी करणेबाबत आपल्यास्तरावरुन आदेशित करावे व जास्तीत जास्त पदवीधर मतदार नोंदणी करण्यासाठी सहकार्य करावे ही नम्र विनंती.

पदनिर्देशित अधिकारी
१४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ

**प्रत:- मा.** जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे